जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

दुरध्वनी क्रमांक – 0712-2565049
ई मेल – dycollrevenuengp@gmail.com वेबसाईट :- http://nagpur.nic.in

क्र/राजस्व/सीआर-60/ब-1/कावि-422/2016 दिनांक 15/06/2016.

विषय :- जमीन - नागपूर जिल्हा.
मौजा नांदा, प.ह.नं. 14, ता. कामठी, जि. नागपूर येथील प्रकल्पग्रस्त पूनर्वसन योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेला भूखंड क्र. A-10, आराजी 720 चौ.मी. भुखंड आर्थिक परिस्थितीमुळे विकण्याची परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :- 1) शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.आरपीएफ-2004/प्र.क्र.91/ज-1, दिनांक 24/12/2004.
2) उपविभागीय अधिकारी, मौदा यांचेकडील पत्र क्र.प्रस्तू-1/उविअ/मौदा/कावि-1096/2016, दिनांक 30/05/2016.

आदेश

आवेदक श्री. नामदेव सदु सोनवणे, रा. c/o श्री. रमेश झुंगरे, प्लॉट नं. 232, गुरुदेव नगर, जवाहर हौसिंग सोसायटी, नागपूर यांनी मौजा नांदा, प.ह.नं. 14, ता. कामठी, जि. नागपूर येथील प्रकल्पग्रस्त पूनर्वसन योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेला भूखंड क्र. A-10, आराजी 720 चौ.मी. भुखंड आर्थिक परिस्थितीमुळे विकण्याची परवानगी मिळण्याबाबत आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याच्या या कारणास्तव विकण्याची परवानगी मिळण्याबाबतचा अर्जान्वये विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणी तहसिलदार, कामठी यांचे स्तरावर प्राथमिक कार्यवाही पूर्ण करुन सदरचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, मौदा यांचे मार्फत शिफारशीसह त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये दिनांक 31/05/2016 रोजी या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. प्रस्तावात उपरोक्त वर्णनाचा अकृषिक भूखंड वाटपाबाबत करारनामा/पट्टा च्या प्रती जोडलेल्या आहेत. या प्रकरणांत तलाठी सा.क्र. 14 यांच्या अहवालावरुन हरकत नसल्याचे दिसून येते. या प्रकरणांत दुय्यम निबंधक श्रेणी-1, कामठी यांनी दिनांक 29/04/2016 रोजी विषयाकिंत बिनशेती जमिनी/भूखंडाकरिता सन 2016 या वर्षाकरिता उक्त भूखंडाचा एकूण रुपये 14,49,900/- दर कळविलेला आहे.

शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.आरपीएफ-2004/प्र.क्र.91/ज-1, दिनांक 24/12/2004 मधील परिच्छेद क्रमांक 4 व 5 अन्वये जमीन हस्तांतरण/विक्री बाबतचे निकष कायम ठेवून विषयात नमूद केलेल्या अकृषिक निवासी भूखंडाची विक्री करण्याची परवानगी मागितलेली असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड दोन मधील महसूल परिपत्रक क्रमांक 3 चे परिच्छेद 78 (अ) 4 मधील तरतूदीनूसार 50 टक्के इतके हस्तांतरण शुल्क आकारावे लागेल. शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.आरपीएफ-2004/प्र.क्र.91/ज-1, दिनांक 24/12/2004 मधील परिच्छेद क्रमांक 4 व शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एलएनडी-1083/27925/सिआर-3671/जी-6, दिनांक 08/09/1983 मधील तरतूदीनूसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड दोन मधील महसूल परिपत्रक क्रमांक 3 चे परिच्छेद 78, 81, 84 व 86 मधील तरतूदीस अनुलक्षून मौजा नांदा, प.ह.नं. 14, ता. कामठी, जि. नागपूर येथील प्रकल्पग्रस्त पूनर्वसन योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेला भूखंड क्र. A-10, आराजी 720 चौ.मी. क्षेत्र खरेदी/विक्री करण्यास आवेदक श्री. नामदेव सदु सोनवणे, रा. c/o श्री. रमेश झुंगरे, प्लॉट नं. 232, गुरुदेव नगर, जवाहर हौसिंग सोसायटी, नागपूर यास वर नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेच्या किंमतीच्या 50 टक्के रक्कम म्हणजेच